# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक २४/०८/२०२२ (बुधवार)**

**(सकाळ)**

---

### जबरी संभोग करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

पो.स्टे. वेलतुरः— दिनांक ०७/०२/२०१९ चे १६.४३ वा. दरम्यान फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. वेलतुर येथे अप. क्र. ३७/२०१९ कलम ३७६(डी)(४)(३) भादवी सहकलम ४,६ पोक्सो कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दिनांक ०७/०२/२०१९ चे ००.०० वा. ते ०८.०० वा. सुमारास फिर्यादी यांची पीडित मुलगी वय १३ वर्ष हिला आरोपी नामे— अमित रामभाउ बान्ते, वय २२ वर्ष, रा. केसोरी याले तिच्याशी शारीरिक संबंध प्रस्थापीत करून तिला मातृत्व लादण्यास कारणीभूत ठरला.

सदर प्रकरण्याचे तपास तत्कालीन मपोउपनि श्रीमती आरती उघडे, पो.स्टे. वेलतुर यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टामध्ये सादर केले. आज दिंनाक २४/०८/२०२२ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश शंडे मॅडम, न्यायाधिश, नागपूर यांनी वरील नमुद आरोपीला कलम ३७६ (२)(आय) भादंवि. कायद्यान्वये १० वर्ष सश्रम कारावास व ४०,०००/—रु. दंड व दंड न भरल्यास २ वर्ष साधी कैद अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी खापर्डे मॅडम यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन मसपोनि श्रीमती शुभांगी वाझे, पोउपनि भवानीप्रसाद मिश्रा तर कर्मचारी सहा.फौज. श्री. सुनिल डोंगरे, पोहवा मनोज तिवारी, पोना प्रकाश वर्मा, पोशि अशरफ शेख यांनी मदत केली आहे.

### विनयभंग करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

पो.स्टे. कळमेश्वर :— दिनांक १५/०३/२०२० चे ०१.१५ वा. दरम्यान फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे अप. क्र. २००/२०२० कलम ३५४, ५०६ भादवी सहकलम १२ पोक्सो कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दिनांक १४/०२/२०२० चे १५.०० वा. सुमारास आरोपी नामे— चंद्रभान चिंधबाजी सोनसरे, वय ५० वर्ष, रा. ब्राम्हणी कळमेश्वर याने फिर्यादी/पीडित मुलगी वय १५ वर्ष हि टयुशनला जात असतांना तिचा पाठलाग करून हाथ पकडण्याचा प्रयत्न करून तिचा विनयभंग करून. आरोपीला दि. १५.०३.२०२० चे ०३.३१ वा. सुमारास अटक करण्यात आली आहे.

सदर प्रकरण्याचे तपास तत्कालीन उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग सावनेर श्री सरंबळकर यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टामध्ये सादर केले. आज दिंनाक २४/०८/२०२२ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश श्री गावंडे, न्यायाधिश, नागपूर यांनी वरील नमुद आरोपीला कलम ३५४ (ड) भादंवि. कायद्यान्वये २ वर्ष कारावास ५ महिने सश्रम कारावास व १०० रू दंड व दंड न भरल्यास ८ दिवस साधी कैद, सहकलम ५०९ भादवी मध्ये २ वर्ष ५ महिने साधी कैद व १०० रू. दंड व दंड न भरल्यास ८ दिवस साधी कैद, कलम १२ पोक्सो मध्ये २ वर्ष ५ महिने साधी कैद व १०० रू. दंड व दंड न भरल्यास ८ दिवस साधी कैद, सहकलम ३(१)(डब्लु) अनुसुचित जाती/अनुसुचीत जमाती अत्याचार प्रतिबंधक अधि. १९८९. कायदामध्ये ६

महिने साधी कैद व १०० रू दंड व दंड न भरल्यास ८ दिवस साधी कैद, सहकलम ३(२)(व्हि)(ए) अनुसुचित जाती/अनुसुचीत जमाती अत्याचार प्रतिबंधक अधि. १९८९. कायदामध्ये ६ महिने साधी कैद व १०० रू दंड व दंड न भरल्यास ८ दिवस साधी कैद अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी श्री साखरे यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन मसपोनि श्रीमती शुभांगी वाझे, पोउपनि भवानीप्रसाद मिश्रा तर कर्मचारी सहा.फौज. श्री. सुनिल डोंगरे, प्रमोद कळंबे, पोहवा मनोज तिवारी, पोना प्रकाश वर्मा यांनी मदत केली आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**